अध्यक्ष महोदय,

मी, आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन सभागृहासमोर सादर करीत आहे.

१. सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी कर संकलनाचे सुधारित उद्दिष्ट रुपये दोन लाख सोळा हजार आठशे चोवीस कोटी आहे. यापैकी वस्तू व सेवा कर (जीएसटी), मूल्यवर्धित कर (व्हॅट), केंद्रीय विक्रीकर (सीएसटी), व्यवसाय कर इत्यादी मुख्य करांसाठी कर संकलनाचे सुधारित उद्दीष्ट रुपये एक लाख चव्वेचाळीस हजार दोनशे शहात्तर कोटी आहे. मला विश्वास आहे की, हे कर संकलनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येईल.

२. राज्यातील उद्योग क्षेत्राद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत असते. महाराष्ट्रात पूर्वीपासूनच उद्योग उभारणीसाठी पोषक वातावरण असल्याने, राज्यात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झालेली आहे. त्यामुळेच देशपातळीवर महाराष्ट्र राज्य औद्योगिकरणात सातत्याने अग्रेसर राहीलेले आहे. सद्य:स्थितीत देशपातळीवर आर्थिक मंदी असल्यामुळे राज्यातील विविध उद्योग आर्थिक विवंचनेतून जात असल्याचे दिसून येत आहे. राज्यातील उद्योगांना चालना मिळावी व त्यातून रोजगार निर्मितीत वाढ व्हावी यासाठी मी खालीलप्रमाणे कर सवलत प्रस्तावित करीत आहे.

➢ <u>कर सवलतीचे प्रस्ताव</u> :—

- मुद्रांक शुल्कामध्ये सवलत :—

राज्यातील बांधकाम क्षेत्रात असलेली मंदीची परिस्थिती पाहता, या क्षेत्रास चालना देणे आवश्यक आहे म्हणून मी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्र आणि पुणे, पिंपरी-चिंचवड व नागपूर या महानगरपालिका क्षेत्रातील दस्तनोंदणीच्यावेळी भराव्या लागणाऱ्या एकंदरीत मुद्रांक शुल्क व इतर निगडीत भारामध्ये पुढील दोन वर्षाच्या कालावधीकरिता १ टक्के सवलत देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

● वीज शुल्कामध्ये सवलत :—

राज्यात उद्योगाला चालना देण्यासाठी मी, औद्योगिक वापरावरील वीज शुल्क सध्याच्या ९.३ टक्क्यावरुन ७.५ टक्के करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

वरील कर सवलतीमुळे राज्यास दरवर्षी सुमारे २५०० कोटी इतकी महसुली तूट होणे अपेक्षित आहे.

३. जागतिक तापमानवाढ (ग्लोबल वॉर्मिंग) व हवामान बदल (क्लायमेट चेंज) या विषयांनी सध्या गंभीर स्वरुप धारण केलेले आहे. वातावरणातील बदलामुळे तापमानात जलदगतीने वाढ होत असून नद्या, जमीन, वने, हवा इत्यादीवर विपरित परिणाम होत आहे. परिणामस्वरुप काही ठिकाणी अवर्षण तर काही ठिकाणी अतिवृष्टी होत आहे. तसेच पावसाळा संपल्यानंतरही बऱ्याच जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारा पडत आहे.

४. पुढील काळात हवामान बदलाच्या अभ्यासाचे धोरण ठरवून त्याची उपयुक्तता सामान्य शेतकरी आणि नागरिक यांना कशी होईल याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. शासनातर्फे येत्या काळात अनेक पर्यावरणपूरक कामे हाती घेतली जाणार आहेत. ज्यामध्ये, वनक्षेत्र वाढविणे, नागरी वनीकरण, अपारंपरिक ऊर्जेचा अधिकाधिक वापर करणे, पाण्याच्या स्त्रोतांचे जतन व संवर्धन करणे, मल:निस्सारण व घन कचरा व्यवस्थापन, नद्यांचे प्रदूषण रोखणे इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे. सदरचे कार्यक्रम हाती घेण्यासाठी शासनाला अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. याकरिता, आतापासूनच विशेष समर्पित निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.

➢ <u>कर वाढीचे प्रस्ताव</u> :—

● पेट्रोल व डिझेलच्या विक्रीवरील मूल्यवर्धित करात वाढ :—

वरील पर्यावरणपूरक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या विशेष समर्पित निधीची तरतूद करण्यासाठी, मी पेट्रोल व डिझेलच्या विक्रीवर सध्या अस्तित्वात असलेल्या कराच्या दराव्यतिरिक्त, अतिरिक्त १ रुपये प्रति लिटर मूल्यवर्धित कर आकारण्याचे प्रस्तावित करत आहे. यामुळे शासनास प्रतिवर्ष

सुमारे १८०० कोटी रुपये इतका अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे, शासन **“ हरित निधी ”** (ग्रीन फंड) या नावाने विशेष समर्पित निधीची निर्मिती करेल व प्रस्तावित कर वाढीमधून गोळा होणारा अतिरिक्त महसूल सदरील **“ हरित निधी ”** यामध्ये वर्ग केला जाईल. हरित निधीची रक्कम शासन, पर्यावरण संवर्धन व जतनाचे, विशेषत: मल:निस्सारण व घन कचरा व्यवस्थापन इत्यादी कार्यक्रम हाती घेण्यासाठी खर्ची करेल.

५. वरील प्रस्तावांना सन्माननीय सभासदांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!